# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# पुणे वृत्तांत
## वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

**दिनांक- 12.02.2026** **वार- गुरुवार**

---

**<u>उपमुख्यमंत्रीसुनेत्रापवार</u>**

पुणे जिल्हा नियोजन समितीची बैठक आज उपमुख्यमंत्री आणि पुण्याच्या पालकमंत्री सुनेत्रा पवार यांच्या उपस्थितीत पार पडली. यावेळी त्यांनी जिल्ह्यातील विविध विकासकामांचा सविस्तर आढावा घेतला. जिल्ह्यातील विकास प्रकल्प ठरलेल्या वेळेत पूर्ण करावेत त्याचबरोबर  पुढच्या वर्षाचं नियोजनही वेळेत पूर्ण करण्याच्या सूचना पवार यांनी संबंधित यंत्रणांना दिल्या.

पुणे जिल्ह्याच्या वाढत्या लोकसंख्येला सामावून घेत, शाश्वत विकास ध्येय साध्य करण्यासाठी, जिल्हा नियोजन आराखड्यात विशेष तरतूद करण्याची मागणी विधान परिषदेच्या उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांनी केली. याबाबतचं निवेदन त्यांनी पालकमंत्री सुनेत्रा पवार यांना सादर केलं  आहे.

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ चौकातील उड्डाणपुलाला माजी उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांचं नाव द्यावं, अशी मागणी आमदार सिद्धार्थ शिरोळे यांनी या बैठकीत केली.

**<u>ई-गव्हर्नन्स</u>**

राज्यातल्या ई-गव्हर्नन्स सुधारणा कार्यक्रमांत पुणे जिल्हा परिषद अव्वल ठरली आहे. या अंतर्गत झालेल्या मूल्यमापनात २०० पैकी १९६ गुण मिळवत पुणे जिल्हा परिषदेने राज्यात प्रथम क्रमांक पटकावला.

डिजिटल प्रशासन, पारदर्शकता आणि नागरिककेंद्रित सेवांमध्ये केलेल्या व्यापक सुधारणांमुळे पुणे जिल्हा परिषदेनं हे यश मिळवलं आहे.

**<u>सौरऊर्जा</u>**

पुण्यात उद्यापासून सौर ऊर्जा उपकरणांचं प्रदर्शन भरवलं जाणार आहे. महाराष्ट्र सोलर मॅन्युफॅक्चरर्स असोसिएशन याचं आयोजन करत आहे. येत्या १५ फेब्रुवारीपर्यंत कृषी महाविद्यालयाच्या मैदानावर हे प्रदर्शन सुरू राहणार आहे. या प्रदर्शनात सौर ऊर्जा क्षेत्रातील नवीन तंत्रज्ञान, शासकीय अनुदान योजना आणि उद्योजकांसाठीच्या संधी; याविषयी तज्ज्ञ मार्गदर्शन करतील, असं संघटनेचे अध्यक्ष अमित कुलकर्णी यांनी सांगितलं.

**<u>ऊसगाळप</u>**

राज्यातला यंदाचा ऊस गाळप हंगाम आता अखेरच्या टप्प्यात आला आहे. आतापर्यंत 82 लाख 55 हजार मेट्रिक टन साखर उत्पादन झालं आहे. पुणे विभागात सर्वाधिक, म्हणजे 19 लाख 95 हजार मेट्रिक टन ऊस गाळप झालं आहे, तर सर्वाधिक साखर उत्पादन आणि निव्वळ साखर उताऱ्यात कोल्हापूर विभागाची आघाडी कायम आहे. येत्या 15 मार्चपर्यंत ऊस गाळप हंगाम सुरू राहण्याची शक्यता आहे.

**<u>विरोधीपक्षनेते</u>**

राष्ट्रवादी काँग्रेसचे पुणे महापालिकेतील गटनेते निलेश निकम यांची महापालिकेच्या विरोधी पक्षनेतेपदी निवड करण्यात आली आहे. महापौर मंजुषा नागपुरे यांनी निकम यांना नियुक्तीचं पत्र दिलं. त्याचबरोबर काँग्रेसचे रामचंद्र कदम, राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे काका चव्हाण आणि शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे नितीन गावडे यांनाही गटनेते म्हणून पत्र देण्यात आलं.

Pcmc

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या २०२६-२७ या आर्थिक वर्षाच्या अंदाजपत्रकासंदर्भात आज आढावा बैठक पार पडली. मुख्य लेखा आणि वित्त अधिकारी प्रविण जैन यांनी महापालिकेच्या आर्थिक स्थितीचा तपशीलवार आढावा सादर केला. दरम्यान ज्यांनी वर्तमान आर्थिक वर्षाचा मालमत्ताकर अजूनही भरलेला नाही, त्यांनी तो तातडीने भरावा असं आवाहन कर संकलन विभागाचे उपायुक्त सचिन पवार यांनी केलं आहे.

एचएसआरपी

वाहनांना उच्च सुरक्षा नंबर प्लेट म्हणजे एचएसआरपी बसवण्यासाठी परिवहन विभागाने पाच वेळा मुदतवाढ दिली होती. तरीही त्याला राज्यातल्या वाहनधारकांचा अत्यंत कमी प्रतिसाद असल्याचं दिसून आलं आहे. त्यामुळे येत्या १५ फेब्रुवारीपासून ‘एचएसआरपी’ नंबर प्लेट नसलेल्या वाहनांवर थेट कारवाई केली जाईल, असं परिवहन विभागानं कळवलं आहे.

पुणे शहर आणि जिल्ह्यात २५ लाखांहून अधिक वाहनांना ‘एचएसआरपी’ बसवणं आवश्यक होतं, मात्र, आतापर्यंत केवळ ८ लाख ६२ हजार वाहनांनाच प्रत्यक्ष नंबर प्लेट बसवली आहे. वाहनधारकांनी विलंब न करता एचएसआरपी बसवून घ्यावी, असं आवाहन परिवहन विभागानं केलं आहे.

कामगारसंघटनांचासंप

देशभरातल्या विविध कामगार संघटनांनी आज केंद्र सरकारच्या धोरणा विरोधात संप पुकारला आहे; पुण्यातही या संपाचे पडसाद उमटले. राष्ट्रीयकृत बँकांसह, शिक्षक- शिक्षकेतर संघटना तसंच असंघटित क्षेत्रातील कामगार संघटनांनी या संपात भाग घेतला. आज दुपारी विविध संघटनांनी एकत्रित येऊन पुणे जिल्हाधिकारी कार्यालयासमोर केंद्र सरकारच्या धोरणा विरोधात घोषणाबाजी केली आणि आपल्या मागण्यांचं निवेदन दिलं.

**हवामान**

पुणे शहर आणि परिसरात आज कमाल तापमान 32 आणि किमान तापमान १४ पूर्णांक ४ दशांश अंश सेल्सियस नोंदवलं गेलं. उद्याही तापमान साधारण असंच असेल असा पुणे वेधशाळेचा अंदाज आहे.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविध भारती पुणे केंद्रावर, संध्याकाळी सहा वाजता, ताज्या पुणे वृत्तांतमध्ये, नमस्कार!**